मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/९/२०२५

माफसू संग्रहालय – पशु, दुग्ध व मत्स्य विज्ञानाचा देखणा प्रवास





प्राणी चर्म जतन (टॅक्सिडर्मी) विभाग : शरीरशास्त्र, शिल्पकला आणि त्वचासंरक्षण यांचा कलात्मक संगम या विभागात अनुभवता येतो. माश्याच्या त्वचेपासून आणि प्राण्यांच्या शिंगापासून तयार करण्यात आलेल्या शोभेच्या वस्तू प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत.



इतिहास विभाग : वैदिक कालापासून पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायाची वाटचाल, रिंडरपेस्ट निर्मूलन व अमूलसारख्या सहकारी संस्थांची यशोगाथा येथे जतन करण्यात आली आहे.



वन्यजीव विभाग : जैवविविधता संवर्धनासाठी पशुवैद्यक क्षेत्रातील योगदान आणि वन हेल्थ संकल्पना येथे प्रतिकृतीच्या माध्यमांतून प्रभावीरीत्या मांडलेली आहे.



शरीररचना विभाग : या कक्षात ऊंट, बैल,शेळी व वराहचे सांगाडे ठेवण्यात आले आहेत

डॉ. अनिल भिकाने
संचालक, विस्तार शिक्षण

डॉ. सारीपुत लांडगे
प्राध्यापक तथा तांत्रिक अधिकारी

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

प्रकाशक
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१
टोल फ्री क्रमांक – १८००-२३३-३२६८
संकेतस्थळ – www.mafsu.ac.in

नागपूरच्या सेमिनरी हिल्सच्या हिरव्यागार परिसरात वसलेले माफसू संग्रहालय हे एक अद्वितीय शैक्षणिक केंद्र आहे. पशुसंवर्धन, दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्य विज्ञानाच्या प्रगत वाटचालीचे दर्शन घडवणारे हे संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले आहे. पारंपरिक ज्ञान, वैज्ञानिक विचार आणि आधुनिक संशोधनाचा सुंदर संगम असलेले हे संग्रहालय शेतकरी, विद्यार्थ्यांसह नागरिकांनाही अनुभवात्मक शिक्षण देणारा मंच ठरतो.

विद्यापीठाच्या शिक्षण विस्ताराच्या दृष्टीने, हे संग्रहालय केवळ माहितीप्रद केंद्र नसून भविष्याच्या दिशेने विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि नागरिकांना प्रेरणा देणारा मंच आहे. ग्रामीण युवक, शेतकरी, उद्योजक आणि अभ्यासक यांच्यासाठी नवे क्षितिज उघडणारे हे दालन आहे.

विविध माहिती दालने

संग्रहालयाच्या आवारात हिरवळीवर महाराष्ट्रातील विविध पशूचें पूर्णाकृती पुतळे ठेवण्यात आले आहेत, तर स्वागतकक्षासह संग्रहालयाच्या आत विविध नऊ दालने आहेत.



माफसू संग्रहालय पत्ता

विद्यापीठ ग्रंथालय इमारत, सेमीनरी हिल्स,
हजारी पहाड रोड, नागपूर-440 001
वेळ : सोमवार ते शनिवार,
सकाळी १० ते सायंकाळी ६



कुक्कुटपालन विभाग : घरगुती ते व्यावसायिक कोंबडीपालन, अंडी व मांसाचे पोषणमूल्य आणि या क्षेत्रातील उद्योजकतेची दारे उघडणारे माहितीपूर्ण मॉडेल्स येथे पाहायला मिळतात.



पशुधन विभाग : देशी प्रजातींची जैवविविधता, पाळीव प्राण्यासाठी गोठा पद्धती, चारा उत्पादन आणि आहार तंत्रज्ञाना संदर्भातील आधुनिक दृष्टिकोन येथे मांडण्यात आले आहेत.



दुग्धविकास विभाग : दूध उत्पादन व प्रक्रिया, दुग्धजन्य पदार्थांचे पोषण मूल्य, दुग्ध प्रक्रिया तंत्रज्ञान आणि दुग्ध सहकाराच्या यशोगाथांचा समावेश या विभागात आहे.



मत्स्यविज्ञान विभाग : माशांची जैवविविधता, सागरी व भूजलस्रोतांतील मत्स्य विकास, मत्स्यपालनाच्या विविध पद्धती मत्स्य पदार्थ आणि मानव आहारात माशांचे महत्त्व येथे स्पष्ट केले आहे.